प्रकरण दुसरे

# संबंधित साहित्याचा आढावा

प्रकरण दुसरे

# संबंधित साहित्याचा आढावा

२.१ प्रस्तावना

२.२ गोस्वामी एम्.एस्.

२.३ रिझवी एस्. ए. एच्.

२.४ पांडे अे.

२.५ गौर आर. एस्.

२.६ सारस्वत आर.

२.७ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण

२.८ समारोप

## २.१ प्रस्तावना

एखाद्या समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी आढावा हा संशोधन प्रक्रियेतील महत्वाचा भाग आहे. यामध्ये समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी यापूर्वी केलेल्या संशोधनाचा आढावा घेतला जातो. सर्व प्रकारच्या संशोधनामध्ये संबंधित साहित्याचा आढावा हा महत्वाचा असतो.

सदरचे संशोधन हे भुदरगड तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांची मूल्ये आणि समायोजन क्षमतेचा अभ्यास असे आहे. हे संशोधन करतेवेळी संबधित विषयावर पूर्वी संशोधन झाले आहे की नाही व झाले असेल तर त्याची उद्दिष्ठे कोणती होती, गृहितके, परिकल्पना, व्याप्ती, मर्यादा इत्यादी विषयांची चर्चा केलेली आहे.

संशोधन करतेवेळी जर निवडलेल्या विषयासंबंधी अस्तित्वात असलेल्या संशोधनाचा अधिकाधिक अभ्यास केला तर अधिक आत्मविश्वासाने समस्येसंबंधी अभ्यास करता येतो. संशोधिकेचा हेतू हा आहे की, संशोधनाअंतर्गत विषयासंबंधी आढावा घेताना संशोधिकेच्या असे निदर्शनास आले की, या विषयीचे संशोधन फारच त्रोटक प्रमाणात झाले आहे. विविध पुस्तके, जर्नल्स् व संबंधीत वाङ:मय यामध्ये शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यामधून पुढील संशोधने उपलब्ध झालेली आहेत.

संशोधिकतेचा प्रस्तुत विषयासंबंधी झालेली संशोधने फारच त्रोटक व तुरळक प्रमाणात आढळतात. या विषयासंबंधीची संशोधने झालेली नाहीत असे नाही. त्यांनी या विषयासंबंधी जी कारणमीमांसा केली, त्याची थोडीशी माहिती वाचकाला व्हावी या उद्देशाने थोडेसे विवेचन करण्याचा प्रयत्न संशोधिकेने केलेला आहे.

शैक्षणिक प्रक्रियेमध्ये योगदान देणारे अनेक घटक असतात. या घटकापैकी शिक्षकांची समायोजन क्षमता व त्याचे चारित्र्य त्याचे संस्कार निश्चितच महत्वाचे असतात. शालेय पातळीवर जसा शिक्षक महत्वाचा असतो तसेच त्याची आदर्श भूमिका विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी व मूल्यवृध्दीसाठी परिणामकारक ठरते. आज मोठया प्रमाणात माध्यमिक स्तरावर मूल्य शिक्षण दिले जाते. मूल्य शिक्षण देणारे म्हणजेच शिक्षक किती मूल्यवान आहेत हे पाहिले पाहिजे आणि हे अभावानेच आढळतात. यासाठीच आज शिक्षकांची मूल्य व समायोजन क्षमतेचा अभ्यास करणे गरजेचे वाटू लागले. यासाठी पूर्वी झालेली संशोधने अभ्यासलेली आहेत.

खालील संशोधकांनी मूल्यांचा अभ्यास केलेला आहे.

## २.२ गोस्वामी एम्. एस्. (१९८३)

**"A Critical Study of Values of School Teachers and Students"**

**"माध्यमिक शाळेतील शिक्षण आणि विद्यार्थी यांच्या मूल्यांचा चिकित्सक अभ्यास"**

मराठीत अनुवाद

गोस्वामी एम्. एस्. यांनी त्यांच्या संशोधनातून मूल्यांचा अभ्यास केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी प्रामुख्याने सामाजिक, सैध्दांतिक व धार्मिक मूल्ये यांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे होती.

१. गुजरात राज्यातील माध्यमिक शाळेतील शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि सौंदर्यविषयक मूल्यांचा अभ्यास करणे.

२. गांधीजींच्या शैक्षणिक विचारानुसार वरील मूल्यांच्या बाबतीत सद्य: परिस्थितीचे सर्वेक्षण करणे.

३. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या विकासामध्ये गांधीजींच्या विचारांच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

४. पूर्व माध्यमिक शाळा आणि सर्वसाधारण शाळा मधील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील मूल्यांची तुलना करणे.

५. माध्यमिक शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या मूल्य उद्बोधनाचा अभ्यास करणे.

त्यांच्या संशोधनामध्ये खालील निष्कर्ष आढळून आले :

१. सैध्दांतिक, सामाजिक आणि धार्मिक मूल्ये यांच्याबाबत सर्वसाधारण शाळेतील शिक्षक आणि माध्यमिक शाळेतील शिक्षक यांच्यामध्ये फरक जाणवून आला आहे. सैध्दांतिक मूल्य आणि धार्मिक मूल्य यांच्याबाबत माध्यमिक शाळेतील शिक्षक हे सर्व साधारणत: शाळेपेक्षा सक्षम (चांगले) आढळून आले.

२. आर्थिक सौंदर्यविषयक आणि राजकीय मूल्यांच्या संदर्भात सर्वसाधारण शाळेतील शिक्षक आणि माध्यमिक शाळेतील शिक्षक यांच्यामध्ये फरक आढळून आला. सर्वसाधारण शाळेतील शिक्षकांचे आर्थिक सौंदर्यविषयक आणि राजकीय मूल्य हे माध्यमिक शिक्षकांच्या मूल्यांपेक्षा अधिक सक्षम दिसून आले.

३. सैध्दांतिक, सामाजिक आणि धार्मिक मूल्यांच्या संदर्भात माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींची वरील मूल्ये ही सर्वसाधारण शाळेत शिकणाऱ्या मुलींच्या पेक्षा अधिक सक्षम आढळून आली आहेत.

४. आर्थिक आणि सौंदर्यविषयक मूल्यांच्या बाबतीत सर्वसाधारण शाळेमध्ये शिकणाऱ्या मुली हया माध्यमिक शाळेतील मुलींच्या पेक्षा अधिक प्रभावी दिसून आल्या.

५. सैध्दांतिक, सामाजिक आणि धार्मिक मूल्यांच्या गुणांचे मध्यमान हे मुलांच्या बाबतीत अधिक प्रभावी दिसून आले.

६. आर्थिक, सौंदर्यविषयक आणि राजकीय मूल्यांचे मध्यमान हे (पोस्ट बेसिक) शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलांच्या पेक्षा सर्वसाधारण शाळेतील शिकणाऱ्या मुलांचे अधिक सक्षम होते.

७. पोस्ट बेसीक शाळा हया नैतिक, सामाजिक आणि धार्मिक मूल्ये आणि गांधीजींचे स्वावलंबीपणा बाबतचे, स्वच्छतेबाबतचे विचार या संदर्भातील मूल्यांची रुजवण करण्यामध्ये सर्वसाधारण शाळांपेक्षा प्रभावी दिसून आल्या.

म्हणजेच पोस्ट बेसीक शाळेमध्ये शिकणारे विद्यार्थी ही सर्वसाधारण शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलांपेक्षा अधिक सक्षम व चांगले आढळून आले.

## २.३ रिझवी एस्. ए. एच. (१९८६)

**"धार्मिक शिक्षण आणि मूल्य शिक्षण उदबोधन यांच्या अंतरसंबंधचा अभ्यास"**

श्री. रिझवी यांनी धार्मिक शिक्षण आणि मूल्य शिक्षण उद्बोधन यांच्या संदर्भातील दृष्टीकोन अभ्यासला आहे.

यांच्या संशोधनाचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे :

धार्मिक शिक्षण आणि मूल्य पध्दती यांचा अंतरसंबंध अभ्यासणे आणि याबाबत विद्यार्थ्यांचा धार्मिक दृष्टीकोन शोधणे ज्यामध्ये धार्मिक शिक्षण उपयोगाचे आहे किंवा नाही हे शोधणे.

रिझवी यांनी हिंदू आणि मुस्लिम धर्मातील अलिगढ मुस्लिम विद्यापीठ यथे शिकणाऱ्या दोनशे पदवीव्युतर विद्यार्थ्यांचा अभ्यास केला आहे. ज्यामध्ये त्यांनी लिकर्ट यांची (Attitude Sch.)अभिवृत्ती धार्मिक शिक्षणाबाबतचे मापन त्याचबरोबर त्यांना राजमानीक यांची धार्मिक अभिवृत्ती मापन, किलबी (Kilby) यांची जीवनाचा मार्ग (मापन) स्केल, अन्सारी यांची मूल्य उद्बोधन स्केल वापरली आहेत.

श्री. रिझवी यांनी धार्मिक, आर्थिक, सामाजिक व स्त्री–पुरुष लिंगभेद याबाबत मिळविलेली माहिती काय स्वेकर व टी टेस्ट वापरुन तपासली आहे.

यांच्या संशोधनातील मुख्य निष्कर्ष हे खालील प्रमाणे आलेले आहेत :

१. जास्ती जास्त विद्यार्थ्यांचा धार्मिक शिक्षणाकडे असणारा कल सर्वसाधारण दिसून आला. परंतू हिंदू आणि मुस्लिम धर्माचे विद्यार्थी वेगवेगळया प्रकारची धार्मिक अभिरुची बाळगतात असे दिसून आले.

२. धार्मिक शिक्षणाच्या बाजूने असणारा दृष्टीकोन हा सहकार्य वृत्ती, परंपरा, निसर्गाचा स्विकार यासी संबंधित आढळून आला.

३. सामाजिक, आर्थिक दर्जा आणि लिंगभेद यांच्याबाबतचे निकष शोधण्यात आलेले नाहीत.

४. वरील मूल्यांच्या संदर्भात विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनात सारखेपणा आढळून आला.

## २.४ पांडे ए. (१९७०)

**"सर्वसाधारण व असाधारण शिक्षक, विद्यार्थी आणि मार्गदर्शक यांची मूल्ये समायोजन क्षमता व व्यावसायिक आवड यांचा चिकित्सक अभ्यास"**

पांडे यांनी समायोजन क्षमतेचा अभ्यास केला आहे.

पांडे यांच्या संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट सर्वसाधारण व असाधारण शिक्षक विद्यार्थी आणि मार्गदर्शक अधिकारी यांच्यामधील मूल्य, समायोजन क्षमता, व्यावसायिक आवड यांचा अभ्यास करणे.

त्यांनी या संशोधनामध्ये (१५ ते १८) पंधरा ते अठरा वयोगटातील (४००) चारशे कुमारावस्थेत असणाऱ्या (१० वी ते १२ वी) दहावी ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यास केला. यासाठी त्यांनी बुध्दीमत्ता चाचणी (शाब्दीक व अशाब्दीक) वापरलेली आहे.

F रेषो हे संख्याशास्त्रीय परिणाम वापरलेले आहे.

पांडे यांच्या संशोधनातील मुख्य निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :

१. सामान्य व असामान्य यांच्या शारीरिक व भावनिक समायोजन क्षमतेत कोणताही फरक आढळून आलेला नाही.

२. १५, १७ व १८ वयोगटातील असामान्य कुमारावस्थेतील विद्यार्थी वरील बाबतीत अधिक सक्षम दिसून आलेले आहेत.

३. वय आणि शिक्षण यांचा चांगल्या समयोजनावर परिणाम झालेला दिसून आला.

४. सामान्य व असामान्य विद्यार्थी यांच्या सौंदर्य विषयक आणि धार्मिक मूल्यांत फरक दिसून आला नव्हता.

५. सैध्दांतिक, आर्थिक आणि राजकीय मूल्यांच्या बाबतीत असामान्य हे समाान्यापेक्षा अधिक सक्षम दिसून आले.

६. शिक्षण आणि वयातील वाढ यांच्या बरोबरच सैध्दांतिक, आर्थिक आणि सामाजिक या मूल्यामध्ये वाढ दिसून आली.

७. सामान्य विद्यार्थ्यांपेक्षा असामान्य विद्यार्थ्यांची व्यवसायिक आवड अधिक आढळून आली.

८. १० वी च्या विद्यार्थ्यांपेक्षा १२ वी च्या विधार्थ्यांची व्यावसायिक आवड अधिक दिसून आली.

९. वय शिक्षण आणि बुध्दीमत्ता यांच्या वाढीबरोबरच व्यावसायिक आवड दिसून आली.

## २.५ गौर आर. एस्. (१९७५)

गौर यांच्या संशोधनाचा विषय **"राजस्थान राज्यातील उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांची मूल्य आणि जाणीव यांचा अध्ययनाशी काय संबंध आहे यांचा अभ्यास करणे"**

यांच्या संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

१. मूल्य आणि स्व जाणीव यांच्या बाबत ग्रामीण आणि शहरी मुले आणि मुली यांच्या अध्ययनामध्ये काय फरक आहे या संबंधाचा अभ्यास करणे.

२. शाळा मित्र आणि समाज व व्यवसाय यांच्या बाबतची विद्यार्थ्यांच्या जाणीवेचा अभ्यास करणे.

यांच्या संशोधनाच्या परिकल्पना खालीलप्रमाणे आहेत :

१. अध्ययनामध्ये मूल्य आणि जाणिव आणि मूल्यात फरक असतो.

२. मुले आणि मुली यांच्या जाणीव आणि मूल्यात फरक असतो.

३. शहरी मुले मुली आणि कुमार यांच्या मूल्यामध्ये ग्रामीण भागातील मुले आणि मुली पेक्षा फरक असतो.

* या संशोधनामध्ये १० वी मध्ये शिकणाऱ्या ७% विद्यार्थ्यांचा नमुना घेतलेला आहे. ही नमूना निवड (सर्टीफाईड) Startified Randomisation Technique या पध्दतीने केलेली आहे आणि संख्याशास्त्रीय विश्लेषणासाठी T टेस्ट वापरलेली आहे.

या संशोधनाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :

१. सैध्दांतिक मूल्यांच्या बाबतीत ग्रामीण किंवा शहरी मुलांच्या बाबतीत कोणताही फरक आढळून आलेला नाही.

२. आर्थिक मूल्यांच्या बाबतीत ग्रामीण मुले आणि मुली यांच्यात काहीही फरक नाही. पण शहरी मुले ही ग्रामीण मुलींपेक्षा सरस आढळून आली.

३. ग्रामीण मुले आणि मुली यांच्या सौंदर्यविषयक, राजकीय आणि धार्मिक मूल्यात कोणताही फरक

नाही.

४. ग्रामीण मुले मुली व शहरी मुले मुली यांच्यात जाणिव आणि आत्मविश्वास यामध्ये काही फरक नाही.

५. ग्रामीण मुले आणि मुली व शहरी मुले मुली यांच्या सामाजिक मूल्यात कोणताही फरक नाही.

६. शहरी मुलींच्या बाबतीत सैध्दांतिक आणि सामाजिक मूल्यांचा अध्ययनावर सकारात्मक प्रभाव दिसून आला. पण आर्थिक आणि धार्मिक मूल्यावर याचा नकारात्मक प्रभाव दिसून आला.

७. शहरी मुलांच्या बाबतीत सैध्दांतिक मूल्यांच्या व अध्ययनाचा अंतर संबंध दिसून आला.

८. ग्रामीण मुलांच्या बाबतीत शालेय अध्ययनावर कोणत्याही मूल्यांचा प्रभाव दिसून आला नाही.

## २.६ सारस्वत आर. (१९८२)

**"उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांची समायोजन क्षमता, मुल्ये आणि संपादवणूक यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा यांचा अभ्यास"**

यांनी उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांची समायोजन क्षमता, मूल्ये आणि संपादवणूक यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा यांच्या संदर्भात अभ्यास केलेला आहे.

यांच्या संशोधनाच्या परिकल्पना खालीलप्रमाणे आहेत :

१. उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांची स्वजाणीव आणि समायोजन क्षमता यामध्ये कोणताही संबंध नाही.

२. उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांच्या स्व जाणीव आणि मूल्ये यांच्यात अंतरसंबंध आहे.

३. उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांची स्वसंकल्पना आणि शैक्षणिक संपादवणूक यामध्ये संबंध आहे.

४. उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांची स्वजाणीव आणि सामाजिक व आर्थिक दर्जा यामध्ये अंतरसंबंध आहे.

५. उच्च माध्यमिक मुले आणि मुली यांच्या स्व जाणीवेत सक्षम फरक आहे.

सारस्वत यांनी दिल्ली शहरामध्ये नववीच्या वर्गात शिकणाऱ्या १४ वर्षे वयाच्या ८४० विद्यार्थ्यांना संशोधनासाठी नमूना म्हणून निवडले आहे. त्यामध्ये ४२० मुली व ४२० मुले यांचा समावेश आहे.

यामध्ये त्यांनी एम्. एस्. एल्. सक्सेना यांची व्यक्तीत्व परख शोधिका वापरली आहे. तसेच आर. के. ओझा यांची मूल्य चाचणी व एस्. पी. कुलक्षेत्रा यांची सामाजिक आर्थिक दर्जा चाचणी वापरली आहे.

या संशोधनात विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षेतील गुणांचा अभ्यास केलेला आहे. ज्यामध्ये त्यांनी T टेस्ट, सहसंबंध गुणक यांचा वापर संख्या शास्त्रीय विश्लेषणात केला आहे.

यांच्या संशोधनातील मुख्य निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :

१. विद्यार्थ्यांची स्वसंकल्पना ही सामाजिक समयोजन क्षमतेशी सकारात्मक दिसून आली आणि मुलींची स्वजाणीव ही घर, आरोग्य, समाज, भावनिकता यांच्याशी संबंधित आढळून आली.

२. विद्यार्थ्यांची स्वजाणीव ही राजकीय आणि धार्मिक मूल्यांशी सकारात्मक व सक्षम दिसून आली पण मुलींची स्वसंकल्पना या संदर्भात वरील बाबतीत दिसून आली नाही.

३. बौध्दीक स्वसंकल्पना ही शैक्षणिक संपादवणूकीशी सकारात्मक संबंध दिसून आला.

४. मुले आणि मुली यांच्या स्वजाणीव संकल्पनेत सक्षम संबंध दिसून आला. ज्यामध्ये शारीरिक सामाजिक आणि नैतिक बाबींचा प्रभाव दिसून आला व वरील बाबतीत मुली या अधिक प्रभावी दिसून आल्या.

## २.७ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपणा

प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक शिक्षकाशी संबंधीत आहे. "माध्यमिक शिक्षकांची मूल्ये आणि समायोजन क्षमतेचा अभ्यास" या समस्येचा अभ्यास करीत असताना प्रस्तुत विषयावर अन्य कोणी संशोधन केले आहे ? कोठे केले आहे ? त्या संशोधनाची उद्दिष्टे कोणती ? संशोधनासाठी कोणती पध्दती वापरली आहे ? संशोधनातून कोणते निष्कर्ष काढले व शिफारसी केल्या ? या सर्व घटकाचा आढावा या प्रकरणात केलेला आहे. त्यासाठी कोणते संदर्भ वापरले आहेत, याची यादी प्रकरणाच्या शेवटी संदर्भसूची मध्ये दिली आहे. पुढील परिच्छेदात प्रस्तुत संशोधन संबंधित संशोधनापेक्षा वेगळे कसे आहे हे स्पष्ट केले आहे.

२.२ मध्ये गोस्वामी एस्. एस्. यांनी त्यांच्या संशोधनातून माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या मूल्यांचा अभ्यास केलेला आहे.

२.३ मध्ये रिझवी एस्.ए.एच्. यांनी धार्मिक शिक्षण आणि मूल्य शिक्षण उद्‌बोधनाचा अभ्यास केलेला आहे.

२.४ मध्ये पांडे यांनी माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मूल्य आणि समायोजन क्षमतेचा अभ्यास केलेला आहे.

२.५ मध्ये गौर आर. एस्. यांनी राजस्थान राज्यातील उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांची मूल्य आणि जाणीव यांचा अध्ययनाशी काय संबंध आहे याचा अभ्यास केला आहे.

२.६ मध्ये सारस्वत यांनी उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांची समायोजन क्षमता, मूल्ये आणि संपादवणूक यांचा आर्थिक व समााजिक दर्जा यांच्या संदर्भात अभ्यास केलेला आहे.

शालेय शैक्षणिक प्रक्रियेमध्ये योगदान देणारे अनेक घटक असतात. त्यामधील महत्वाचा घटक म्हणजे शिक्षक या शिक्षकांची आदर्श भूमिका विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी व मूल्यबृध्दीसाठी परिणामकारक ठरते. मुले व तरुण हे अनुकरणप्रिय असतात. अप्रत्यक्षरित्या ते शिक्षकांचे अनुकरण करीत असतात. शिक्षकांच्या भूमिकेकडे एक आदर्श शिक्षक म्हणून पहात असतात. शिक्षकामधील मूल्य प्रणालीचा मोठा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडत असतो. तसेच मूल्यशिक्षणाबरोबरच शिक्षकांची विविध क्षेत्रातील समयोजन क्षमता हा महत्वाचा घटक आहे. आजकाल या व्यवसायातील व्यक्तीविषयी बरीच टिका ऐकावयास मिळते. म्हणून संशोधिकेला या व्यवसायामधील शिक्षकांची मूल्यप्रणाली आणि त्यांची समायोजन क्षमता या बाबीवरील संशोधनामध्ये कमतरता आढळून आली. त्यामुळेच वरील क्षेत्रामध्ये संशोधन करण्याची गरज वाटली.

वरील संशोधन समस्या निवडल्यानंतर संशोधनाशी संबंधीत साहित्यांचा आढावा घेतल्यानंतर या विषयावर कोठेही संशोधन झालेले आढळून आले नाही. माझे संशोधन हे वरील आढावा घेतलेल्या संशोधनापेक्षा पूर्णत: वेगळा आहे हे स्पष्ट होते.

## २.८ समारोप

प्रस्तुत प्रकरणात संशोधन पदवीसाठी विद्यापीठामधून सादर केलेले साहित्य यांचा आढावा घेतला आहे व प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण स्पष्ट केलेले आहे.

पुढील प्रकरण तीनमध्ये संशोधनाच्या कार्यपध्दतीबद्दल सविस्तर माहिती दिली आहे.